CMYK

बीड । शुक्रवार
२८.०३.२०२५
वर्षे : ४ अंक : ३४९
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# देशात कोण आला, कधी आला, किती काळासाठी आला, प्रत्येकाचा लेखा-जोखा तयार करणारा कायदा येणार

**वृत्तसंस्था**

देशात कोण आला? कधी आला? किती काळासाठी आला? त्याचा येण्याचा उद्देश काय? या सर्व प्रश्नांची उत्तरे नवीन कायद्यातून मिळणार आहे. देशात येणाऱ्या प्रत्येक विदेश नागरिकांचा डेटाबेस तयार करण्यात येणार आहे. यासंदर्भातील विधेयक केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी गुरुवारी मांडला. 'इमिग्रेशन रिफॉर्म बिल' मुळे देशात येणाऱ्या प्रत्येक विदेशी नागरिकांच्या हालचाली कळणार आहे. देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने हे महत्वपूर्ण विधेयक ठरणार आहे.

अमित शाह यांनी विधेयक मांडताना सांगितले, जे लोक भारती व्यवस्थेत त्यांचे योगदान देऊ इच्छितात, त्यांचे स्वागत करण्यात येणार आहे. परंतु रोहिंग्या असो की बांगलादेशी हे भारताची शांतता भंग करतात. त्यांच्यावर कठोर नजर ठेवली जाणार आहे. हे विधेयक देशाच्या सुरक्षेसाठी महत्वाचे विधेयक ठरणार आहे. या नवीन कायद्यामुळे जुने तीन कायदे निष्क्रीय होणार आहेत. ते



जुने तीन कायदे ब्रिटनच्या संसदेत तयार झाले होते. ते कायदे इंग्रजांच्या हिताचे संरक्षण करणारे होते. आता येणारा नवीन कायदा विकसित भारत दाखवणार असणार आहे. या कायद्यामुळे भारतात आल्यानंतर त्या व्यक्तीने नियमांचे पालन केले नाही तर त्याला अटक करण्याची शक्ती तपास संस्थांना मिळणार आहे.

देशात पारसी आजही सुरक्षित

अमित शाह यांनी भारतात शरणार्थींचे नेहमी सन्मान केले जात असल्याचा इतिहास सांगितला. ते म्हणाले, पारसी लोकांनी भारतात आश्रय घेतला. त्यानंतर ते आजही देशात सुरक्षित आहे. जगातील सर्वात कमी लोकसंख्या असलेल्या या समुदायाचा कुठे सन्मान होत असेल तर भारत आहे. सीएए कायद्यामुळे शेजारच्या देशांमध्ये अत्याचार सहन करणारे अल्पसंख्याकही भारतात येत आहे.

### • काय आहे नवीन कायद्याचे महत्व

गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटले की, जुने कालबाह्य कायदे निष्क्रीय होणार आहे. तसेच आजच्या गरजेनुसार नवीन कायदे आता येणार आहे. नवीन कायदे भारताच्या व्यवस्थेला सुरक्षा प्रदान करणारे असणार आहेत. तीन वर्षांच्या मंथनानंतर हे कायदे तयार करण्यात आले आहे. विरोधकांनी या कायद्याला विरोध करु नये. देशाची सुरक्षा, आर्थिक प्रगतीसाठी हे कायदे गरजेचे आहे. उत्पादन आणि व्यापार, देशाच्या शिक्षण पद्धतीला पुन्हा एकदा जगात मान्यता मिळवून देण्यासाठी, आपल्या विद्यापीठांचे जागतिकीकरण करण्याचा मार्ग मोकळा करण्यासाठी आणि २०४७मध्ये या देशाला जगातील सर्वोत्तम बनवण्यासाठी हे एक अतिशय महत्त्वाचे विधेयक आहे.




# आ. संदीप क्षीरसागर महाराष्ट्र विधीमंडळ समितीवर

**मुंबई । प्रतिनिधी**

बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांची महाराष्ट्र विधीमंडळाच्या पंचायतराज या महत्त्वपूर्ण समितीवर निवड झाली आहे. गुरूवारी (दि.२७) रोजी विधीमंडळ सचिवालयाकडून ही निवड जाहीर करण्यात आली असून, त्यांच्या या नव्या जबाबदारीबद्दल राजकीय वर्तुळातून कौतुक होत आहे.

आ. संदीप क्षीरसागर हे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार असून, बीड जिल्ह्यातील जनतेच्या प्रश्नांना विधानसभेत प्रभावीपणे वाचा फोडण्यासाठी ते ओळखले जातात. आमदार होण्याअगोदर

▶▶ उर्वरित पान २ वर



### • ही माझ्यासाठी मोठी जबाबदारी– आ.संदीप क्षीरसागर

विधीमंडळाच्या पंचायत राज समितीमध्ये निवड ही माझ्यासाठी मोठी जबाबदारी आहे. मी माझ्या मतदारसंघातील आणि महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील जनतेच्या हितासाठी पंचायत राज समितीच्या माध्यमातून काम करेन. बीड जिल्ह्याच्या विकासाला गती देण्यासाठी आणि जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी मी कटिबद्ध आहे. असे, निवडीबद्दल प्रतिक्रिया देताना आ. क्षीरसागर यांनी म्हटले.

# शूल्लक कारणावरून रक्तरंजित राडा; एकाची प्रकृती चिंताजनक

### • बार्शी नाका परिसरातील घटना

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील बार्शी नाका परिसरात हिना पेट्रोल पंप समोरील भागात शुल्लक कारणावरून वाद झाला.या वादातून दोन गटांमध्ये तुफान हाणामारी झाली. या भांडणात धारदार शस्त्रांचा वापर करण्यात आला असून, यामध्ये तिघेजण गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर सध्या जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. यापैकी एकाची प्रकृती चिंताजनक असून त्यांना संभाजीनगर येथे पुढील उपचारासाठी पाठवण्यात आले.

प्राथमिक माहितीनुसार, या वादाची सुरुवात लहान मुलांच्या भांडणातून शुल्लक कारणावरून झाले. कालचा झालेला वाद आज मिटवण्यासाठी दोन्ही गट दुपारी समोरासमोर बसले. मात्र, वाद मिटण्याऐवजी तो अधिक



चिघळला आणि अखेर हाणामारीत परिवर्तित झाला.एका गटाने दुसऱ्या घरावर हल्ला चढवला या हल्ल्यात कोयता, तलवार धारदार शस्त्रांचा वापर करूत हल्ला करण्यात आल्याची सांगण्यात येत असून. यामध्ये १) मोमीन अन्सार अब्दुल सत्तार,२)मोमीन मुजाहिद अब्दुल सत्तार ३) मोमीन शहबाज मोमीन हे तिघे गंभीर जखमी झाले आहेत. हे सर्वजण बार्शी नाका, हिना पेट्रोल पंप परिसरातील रहिवासी आहेत.यातील एकाची प्रकृती चिंताजनपसून पुढील उपचारासाठी. संभाजीनगर येथे हलवण्यात आले.या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न सुरू असून, या हाणामारीत सहभागी असलेल्या आरोपींचा शोध घेतला जात आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत. या हल्ल्याची माहिती मिळताच बीड शासकीय रुग्णालयामध्ये जखमी ना पाहण्यासाठी गर्दी झाली होती.

### चिमुकल्याला दगडाला बांधून आई करायची मोलमजुरी, एकनाथ शिंदे मदतीला धावून आले



**मुंबई । प्रतिनिधी**

सोशल मीडियावर दररोज अनेक व्हिडीओ चर्चेत येतात. काही व्हिडीओ इतके व्हायरल होतात की त्याची चर्चा सर्वत्र होते. काही दिवसांपूर्वी असाच एक व्हिडीओ समोर आला होता. त्या व्हिडीओमध्ये एक आई तिच्या ३ वर्षांच्या बाळाला दगडाला बांधून उन्हात मजूरी करताना दिसली होती.

▶▶ उर्वरित पान २ वर

# दीड लाख रुपयांची लाच घेताना क्रीडा अधिकारी कविता नावंदे जाळ्यात

**परभणी । प्रतिनिधी**

परभणी : राज्यात गेल्या काही महिन्यात एसीबी म्हणजे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) कारवाईचा धडाका लावला असून अनेक सरकारी कर्मचारी, अधिकारी जाळ्यात अडकल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामध्ये, पोलीस, वन, महसूल विभागासह विविध शासकीय विभागातील



अधिकाऱ्यांचा उल्लेख आहे. त्यात, महिला अधिकारी, कर्मचारीही आहेत. आता, परभणी जिल्ह्यातील एसीबीकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी कविता नावंदे एसीबीच्या जाळ्यात अडकल्या आहेत. स्विमिंग पूल बांधण्यास परवानगी देण्यासाठी कविता नावंदे यांनी अडीच लाख

▶▶ उर्वरित पान २ वर

### नदीचे पात्र कोरडेठाक पडल्याने गेवराईतील ग्रामस्थ सराटी अंतरवालीत,

# पाणी सोडण्यासाठी मनोज जरांगेचा थेट कलेक्टरला फोन

**गेवराई । प्रतिनिधी**

मागील एक महिन्यापासून गोदावरी कोरडी ठाक पडल्याने नदी काठावरील गेवराईतील विविध गावातील नागरिकांनी आज अंतरवाली सराटीत दाखल झाले. पाण्याविषयी मनोज जरांगे-पाटील यांना ग्रामस्थांनी

▶▶ उर्वरित पान २ वर



# निर्दयतेचा कळस! दत्तक चिमुकलीला दिले चटके, हातपाय मोडून आई वडिलांनीच केला खून

**सिल्लोड । प्रतिनिधी**

चार मुले होते म्हणून जालना येथून ६ महिन्यापूर्वी दत्तक घेतलेल्या ४ वर्षीय चिमुकल्या मुलीची आई व वडिलांनीच हातपाय मोडून, अंगावर चटके देऊन निर्घृण हत्या केल्याची खळबळजनक घटना गुरुवारी पहाटे ३ वाजता सिल्लोड शहरातील मुगलपुरा भागात उघडकीस आली. या प्रकरणी सिल्लोड शहर पोलिसांनी निर्दयी आई- वडिलांना अटक



करून त्यांच्या विरुद्ध खुनाचा

▶▶ उर्वरित पान २ वर



# महाराष्ट्रावर चक्रीवादळाचं संकट ? ८ जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा इशारा

**मुंबई । प्रतिनिधी**

दिवसा उष्णता वाढत असली तरी रात्री आणि पहाटेच्या सुमारास हवेत गारवा निर्माण झाला आहे. याचं कारण म्हणजे सतत हवापालट होत आहे. याचा परिणाम आंबा, काजू, शेती, संत्री, द्राक्ष या सारख्या फळबागांवर होत असल्यानं शेतकऱ्याचं मोठं नुकसान होत आहे. दुसरीकडे सतत हवापालट होत असल्यानं शेतकरीच नाही तर सर्वसामान्य लोकांनाही याचा मोठा त्रास होत आहे. ही हवापालट होण्याचं मोठं कारण म्हणजे दक्षिणेकडे कमी दाबाचा पट्टा तयार झाला असून त्याचं रुपांतर चक्रीवादळात होण्याची शक्यता आहे. त्याचा मोठा फटका दक्षिणेतील राज्यांना बसत आहे. कर्नाटकात अति मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. महाराष्ट्रात हे चक्रीवादळ धडकणार नसलं तरी त्याचा परिणाम हवामानावर होणार आहे. दिवसभर चढणारे ऊन, घामाच्या धारा, वाढणारा उकाडा, संध्याकाळनंतर अचानक सोसाट्याचा वारा, विजांचा कडकडाट आणि हवेत गारवा निर्माण होतो. त्यानंतर पाऊस पडतो. अचानक पावसामुळे रात्री

▶▶ उर्वरित पान २ वर




CMYK

# आता, रांगेत उभं राहायची झंझट मिटली; मंत्रालयात ॲपद्वारे मिळणार प्रवेश, अशी करावी नोंदणी

मुंबई : मंत्रालय सुरक्षा प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पातंर्गत पहिल्या टप्प्यात चेहरा ओळख आधारित प्रवेश प्रक्रिया कार्यान्वीत करण्यात आली. तसेच टप्पा २ अंतर्गत प्रवेशासाठी व्हीजीटर मॅनेजमेंट सिस्टीम प्रणाली विकसित करण्यात आली आहे. मंत्रालयात क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी, अभ्यागत यांना यापुढे कोणत्याही कामाकरिता प्रवेश हवा असल्यास त्यांना 'डिजीप्रवेश' या ऑनलाईन ॲप आधारित प्रणालीद्वारे मंत्रालयात प्रवेश मिळणार आहे. अभ्यांगतांना मंत्रालयाच्या ज्या विभागात कामानिमित्त प्रवेश आवश्यक आहे. केवळ त्यांना दिलेल्या वेळेत आणि अनुज्ञेय असलेल्या मजल्यावरच प्रवेश करावा.




अनधिकृत मजल्यावर प्रवेश केल्यास अभ्यागत कारवाईस पात्र राहतील. अभ्यागतांनी संबंधित विभागातील आपले काम पूर्ण झाल्यावर विहीत वेळेत मंत्रालयातून बाहेर पडावे. ज्येष्ठ नागरीक व दिव्यांग अभ्यागतांना रांगेत उभे राहण्यामुळे होणारा त्रास विचारात घेता त्यांना दुपारी १२ वाजता प्रवेश देण्यात येईल. तर दुपारी १२ नंतर ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग अभ्यांगत यांचेसाठी स्वतंत्र रांगेची व्यवस्था राहील. तसेच ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग अभ्यांगत यांनी तत्संबंधीचे वैध प्रमाणपत्र सोबत ठेवणे आवश्यक आहे.

मंत्रालयात येणाऱ्या सर्व अभ्यागतांना दुपारी २ वाजेनंतर प्रवेश देण्यात येईल. अशा प्रवेशासाठी त्यांना डिजीप्रवेश या ऑनलाईन ॲप आधारीत प्रणालीद्वारे मंत्रालय प्रवेशपास घेऊन मंत्रालयात प्रवेश मिळविता येईल. अभ्यागतांनी मंत्रालयात प्रवेश मिळविण्यासाठी आधार कार्ड, वाहन परवाना, पॅन कार्ड आदी शासन मान्य ओळखपत्र सादर करणे आवश्यक आहे. अशिक्षीत तसेच स्मार्टफोन नसलेल्या अभ्यांताकरीता गार्डन गेट येथे ऑनलाईन ॲप आधारीत प्रणालीद्वारे मंत्रालय प्रवेश नोंदणीकरीता तसेच मदतीकरीता एक खिडकी उपलब्ध असणार आहे.

'डिजीप्रवेश' ॲपद्वारे आपली नोंदणी केल्यानंतर मिळणाऱ्या क्यू आर कोड आधारे मंत्रालयाबाहेर असलेल्या खिडकीवर मंत्रालय प्रवेशाकरिता आरएफआयडी कार्ड वितरीत करण्यात येईल. हे आरएफआयडी कार्ड आधारे सुरक्षाविषयक तपासणी करून मंत्रालयात प्रवेश देण्यात येईल. अभ्यागतांना आरएफआयडी प्रवेश ओळखपत्र परिधान करणे व मंत्रालयातून बाहेर जाताना ते सुरक्षा कर्मचाऱ्यांकडे जमा करणे बंधनकारक राहील.

### अभ्यागतांनी अशी करावी नोंदणी

'डिजीप्रवेश' ॲप हे मोबाईल ॲप ॲण्ड्राईड आणि आयओएस ॲपल या दोन्ही प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात आले आहे. आपल्या मोबाईल च्या प्रणालीनुसार ॲण्ड्राईडमध्ये प्ले स्टोअर वर तर आयओएस पलवर ॲपल स्टोअरवर digi pravesh हे सर्च केल्यास हे ॲप विनामुल्य डाऊनलोड करता येते. या ॲपवर सुरूवातीला केवळ एकदाच नोंदणी करणे आवश्यक राहील. नोंदणी झाल्यानंतर आधार क्रमांकावर आधारीत यंत्रणेद्वारे छायाचित्राची ओळख पटवून नोंदणी पूर्ण केल्यानंतर ज्या विभागात काम आहे, त्याचा स्लॉट बुक करून रांगेशिवाय प्रवेश घेता येईल. या संपूर्ण प्रक्रियेला तीन मिनीटांपेक्षा कमी कालावधी लागतो.

पान १ वरून पुढे...

## आ. संदीप...

आ.संदीप क्षीरसागर यांनी पाच वर्षे पंचायत समिती सभापती, अडीच वर्षे जिल्हा परिषद सदस्य व पाच वर्षे जिल्हा परिषद सभापती असे एकूण साडेबारा वर्षे पंचायत राज व्यवस्थेमध्ये प्रत्यक्ष काम केले आहे. त्यामुळे पंचायत राज व्यवस्थेचा त्यांना सखोल अभ्यास आहे. आता पंयायतराज समितीवर त्यांची निवड झाल्याने त्यांना विधीमंडळाच्या कामकाजातही अधिक सक्रिय सहभाग घेता येणार आहे. ही समिती राज्यातील पंचायत राज विभागाच्या महत्त्वाच्या धोरणांवर देखरेख ठेवून सरकारला शिफारशी करण्याचे काम करते. आ. क्षीरसागर यांनी यापूर्वी विधानसभेत अनेकदा बीड जिल्ह्यातील पाणीटंचाई, ग्रामीण विकास आणि सामाजिक प्रश्नांवर भाष्य केले आहे. त्यांच्या या नव्या भूमिकेमुळे त्यांना समितीच्या म ाध्यमातून राज्यस्तरीय धोरणांवर प्रभाव टाकण्याची संधी मिळणार आहे. त्यांच्या निवडीबद्दल त्यांचे समर्थक आणि पक्ष कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला आहे.

## एकनाथ शिंदे...

जेव्हा तिला युट्युबर शितल यांनी मुलाच्या यासंदर्भात विचारले, तेव्हा आईने सांगितले होते की त्याला बोलता येत नाही. दवाखान्यात जायला पैसे नाही, असे सांगितले होते. पण आता या चिमुकल्याच्या मदतीला थेट उपमुख्यमंत्री धावून आले आहेत. एकनाथ शिंदे यांनी थेट या चिमुकल्याच्या कुटुंबाला मदत जाहीर केली आहे. सध्या सोशल मीडियावर या चिमुकल्याचा तो जुना व्हिडीओ व्हायरल होत असून नेटकरी चिमुकल्याला मदत केल्याबद्दल एकनाथ शिंदे यांचे आभार मानत आहे.

उपमुख्यमंत्र्यांनी घेतली दखल, जाहीर केली मदत

या घटनेचा व्हिडीओ समोर आल्यानंतर माध्यमांशी बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली. मुलाचं ऑपरेशन करणार असल्याचं ते म्हणाले. बाकी मुलं जसे नॉर्मल असतात, तसे आम्ही सुद्धा त्या मुलाला नॉर्मल करण्याचा प्रयत्न करू, असेही ते म्हणाले. ते म्हणाले, ऑपरेशनची जबाबदारी शिवसेनेने घेतली आहे. आज त्या परिवाराला बघून समाधानही वाटते आम्ही त्या परिवारासाठी काहीतरी करू शकणार.

## दीड लाख...

रुपयांची लाच मागितली होती. त्यातील, दीड लाखांची लाच घेताना रंगेहात पकडले आहे.

परभणी जिल्ह्यातील क्रीडा विभागात लाचप्रकरणामुळे खळबळ उडाली आहे. एका क्रीडा स्पर्धेचे बिल आणि स्विमिंग पुल मान्यतेसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कविता नावंदे यांनी लाच मागितली होती. कविता यांनी या मंजुरीसाठी संबंधितांकडे अडीच लाख रुपयांची लाच मागितली होती, ज्यात दीड लाख रुपये स्वीकारताना त्यांना एसीबीच्या अधिकाऱ्यांनी रंगेहात पकडले आहे. परभणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवाईमुळे जिल्ह्याच्या प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाला पेन्शनसाठी मागितलेले पैसे असो की, क्रीडा कर्मचाऱ्यालाही क्रीडा स्पर्धेचे बिल काढण्यासाठी मागितलेली पैसे असो अशा अनेक आर्थिक गैर व्यवहाराचे आरोप त्यातच नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदारांनी लावलेली लक्षवेधी चर्चेत असतानाच परभणीच्या जिल्हा क्रीडा अधिकारी कविता नावंदे यांना तब्बल दीड लाखांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी रंगेहात पकडले आहे. मानवत येथील एका तक्रारदाराला तिथल्या क्रीडा स्पर्धेचे बिल तसेच स्विमिंग पूलचं मान्यता देण्यासाठी कविता नावंदे यांनी अडीच लाखांची लाच मागितली होती. त्यातील एक लाख रुपये पहिल्यांदाच त्यांनी स्वीकारले होते त्यानंतर ही रक्कम द्यायची नव्हती. त्यामुळे या तक्रारदाराने परभणी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली त्या अनुषंगाने या तक्रारीची पडताळणी करण्यात आली आणि आज सापळा रचून दीड लाख रुपये स्वीकारताना कविता नावंदे यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. सध्या त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयामध्ये नेण्यात आले असून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया ही सुरू आहे.

कविता नावंदे यांच्यावर आरोप असलेले प्रकरण

१) क्रिडा अधिकारी कार्यालयातील कर्मचारी गौतम यांच्या मृत्यू नंतर त्यांच्या कुटुंबियांना पेन्शन मंजूर करण्यासाठी पैसे मागितल्याचा कुटुंबाचा आरोप यावरूनच राष्ट्रवादीचे आमदार राजेश विटेकर यांनी लक्षवेधी मांडली होती हाच मुद्दा घेवून उबाठा चे आमदार राहुल पाटील यांनीही नावंदे यांना निलंबित करण्याची मागणी अधिवेशनात केली होती.

२) जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील कर्मचारी मुंडे यांनाही क्रीडा स्पर्धेचे बिल काढण्यासाठी पैसे मागितल्याची ऑडियो क्लिप चांगलीच वायरल झाली होती.

दरम्यान, कविता नावंदे यांच्यावर यापूर्वीही गैरव्यवहारांचे अनेक आरोप करण्यात आले होते. तर, नुकतेच पार पडलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातही जिल्ह्यातील २ आमदारांनी त्यांच्या कारभाराबद्दल विधिमंडळ सभागृहात लक्षवेधी मांडली होती. त्यातच, एबीसी अधिकाऱ्यांना धाड टाकून त्यांना १.५ लाख रुपयांची लाच घेताना रंगेहात अटक केली आहे.

## पाणी सोडण्यासाठी...

सांगताच जरांगे यांनी थेट बीडचे कलेक्टर यांना फोन करत गोदावरी पात्रात पाणी सोडण्याची विनंती केली.याची कलेक्टर अविनाश पाठक यांनी दखल घेत संबधित विभागाशी लेखी तक्रार करून दोन दिवसात पाणी सोडण्यात येईल असे आश्वासन दिले. गोदावरीच्या काठावर असलेल्या गेवराईतील नागझरी, खामगाव, सावळेश्वर, म्हाळस पिंपळगाव, गंगावाडी, राक्षसभुवन, पांचाळेश्वर तर अंबडमधील शहागड, गोरीगंधारी, डोमलगाव, साष्ट पिंपळगाव, बाणेगाव यासह गोदाकाठच्या अनेक गावांना नदी कोरडीठाक पडल्याने मागील एक महिन्यापासून पाणी टंचाईशी सामना करावा लागत आहे. पशुधन यांच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. याबाबत गोदावरी काठावरील गावातील नागरिकांनी अनेकवेळा मागणी करूनही गोदावरीत पाणी सोडण्यात येत नसल्याने आज गोदाकाठच्या अनेक गावातील नागरिकांनी एकत्र येऊन अंतरवाली सराटीत जाऊन मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांची भेट घेऊन ही गंभीर बाब त्यांना सांगण्यात आली. यावरुन मनोज जरांगे पाटील यांनी तात्काळ बीडचे कलेक्टर अविनाश पाठक यांना फोन करून दोन दिवसात गोदावरी पात्रात पाणी सोडण्यात यावे अशी मागणी केली. या मागणीची तात्काळ दखल घेत कलेक्टर यांनी पाटबंधारे विभागाशी लेखी तक्रार करून तात्काळ पाणी सोडण्याचे आश्वासन दिले. भाऊसाहेब नाटकर, अँड नारायण शिंदे, सुभाषराव केरूळकर, भाऊसाहेब शिंदे, दादासाहेब उदे, भाऊसाहेब डिंगरे, बाळासाहेब खेडकर, मुकेश कुटे, ऋषिकेश उदे, शरद अबुज, किशोर सुरवसे, अजय उदे या नागरिकांनी एकत्र येऊन त्यांची भेट घेतली.

## निर्दयतेचा कळस! ...

गुन्हा दाखल केला आहे.मृत चिमुकलीचे नाव आयात फईम शेख असे आहे. तर फौजिया शेख फईम ( २७) आणि शेख फईम शेख आयुब ( ३५ वर्ष दोघे रा. अजिंठा हल्ली मुक्काम मुगलपुरा, सिल्लोड) असे आरोपींची नावे आहेत. प्राथमिक माहितीनुसार, अजिंठा येथून १५ दिवसांपूर्वी सिल्लोड येथील मुगलपुरा भागात हे कुटुंब राहायला आले. तेव्हापासून या दोघांनी मिळून आयातचा मागील १५ दिवस अमानुष छळ केला. उपाशी ठेवत तिला चटके दिले. तसेच हातपाय पिरगाळून तोडले. त्यानंतर डोक्यात व पाठीत जोराने मारत तिला गंभीर जखमी केले. अमानुष मारहाण झालेल्या या चिमुकलीने अखेर गुरुवारी पहाटे ३ वाजच्या दरम्यान प्राण सोडले. पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न

अत्यंत निर्घृणपणे हत्या केल्यानंतर पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने या निर्दयी मातापित्याने पहाटे ३ वाजता सिल्लोड येथील एका कब्रस्तानमध्ये परस्पर दफनविधी उरकण्याचा प्रयत्न केला. मात्र, काही नागरिकांच्या हा प्रकार लक्षात आल्याने त्यांनी सिल्लोड शहर पोलिसांना घटनेची माहिती दिली. सहायक पोलिस अधीक्षक मयंक माधव, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिनेश कोल्हे, फौजदार बी.एस. मुंढे, डी.आर. कायंदे यांनी घटनास्थळी जाऊन दफनविधी रोखला. तसेच मृतदेह शवविच्छेदनासाठी सिल्लोड येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केला. घटनेची माहिती वाऱ्यासारखी सिल्लोड शहरात पसरली. त्यानंतर नागरिकांनी रुग्णालय व पोलीस ठाण्यात गर्दी केल्याने काही काळ तणाव निर्माण झाला होता.

कारण अद्याप अस्पष्ट

पोलिसांनी हत्या करणाऱ्या दोघा आईवडिलांना अटक करून त्यांच्या विरुद्ध सिल्लोड शहर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल केला. शोकाकुल वातावरणात सिल्लोड येथील कब्रस्तानमध्ये गुरुवारी सायंकाळी ५ वाजता चिमुकलीची मूळ आई व हत्या करणाऱ्या आई वडिलांच्या उपस्थितीत दफनविधी करण्यात आला. या घटनेमुळे सिल्लोड शहरात खळबळ उडाली आहे. दोन्ही आरोपी हे मूळचे अजिंठा येथील रहिवासी असून ते १५ दिवसांपूर्वी सिल्लोड येथील मुगलपुरा भागात राहायला आले होते. सिल्लोड येथे आल्यापासून त्यांनी मुलींचा छळ सुरू केला होता. इतक्या निर्दयीपणे मारहाण करून, चटके देऊन खून का केला हे अद्याप स्पष्ट झाले नाही. सिल्लोड पोलीस पुढील तपास करत आहेत.

## महाराष्ट्रावर चक्रीवादळाचं...

आणि पहाटे हवेत गारवा निर्माण होतो, मात्र नंतर उष्णता वाढते असं सध्या दुहेरी संकट आहे. एकीकडे वाढणारी उष्णता दुसरीकडे अवकाळी पाऊस यामध्ये शेतकऱ्याचं अतोनात नुकसान होत आहे.

पुन्हा एकदा सायक्लोनिक सर्क्युलेशनसारखी स्थिती निर्माण झाली आहे. दक्षिणेकडून येणाऱ्या वाऱ्यांमुळे कर्नाटक आणि महाराष्ट्रात हवापालट झाली असून मुसळधार पाऊस पडत आहे. हवामान विभागाने आता पुन्हा एकदा ८ जिल्ह्यांसाठी अलर्ट दिला आहे. त्याच वेळी दुसरीकडे दिवसा तीन ते चार डिग्री तापमान वाढ होईल असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

कोकणपट्ट्यात रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह पावसाचा इशारा २९ आणि ३० मार्च रोजी देण्यात आला आहे. मुंबई, ठाणे आणि नवी मुंबईत यावेळी कोरडं किंवा ढगाळ वातावरण राहील असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. पश्चिम महाराष्ट्रात पुण्यात गारवा राहील, तर काही भागात पावसाच्या तुरळक सरी बरसतील. कोल्हापूर, घाटमाथ्यावर मात्र ढगांच्या गडगडाटासह पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

सातारा आणि घाटमाथ्यावर देखील २९ आणि ३० मार्च रोजी पाऊस पडेल असा अंदाज वर्तवला आहे. सांगली, सोलापूरमध्येही पाऊस पडेल. छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीडमध्ये हलक्या सरी बरसण्याची शक्यता आहे. या व्यतिरिक्त उर्वरित महाराष्ट्रात वातावरण कोरडं राहणार आहे. दुसरीकडे महाराष्ट्रात मागच्या २४ तासात ३८ ते ४० डिग्री तापम ानाची नोंद अनेक जिल्ह्यांमध्ये करण्यात आली आहे. तर पुढचे तीन दिवस तापमान वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

पान ४ वरून पुढे...

## शासकीय आर्थिक...

रात्री १२.०० वाजेपर्यंत चालू ठेवण्याबाबत जिल्हाधिकारी बीड यांनी आदेशित केलेले आहे. बीड जिल्ह्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी अचूक देयके कार्यालयीन वेळेत सादर करून दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत देयकाबाबतची कार्यवाही पूर्ण करून घ्यावी, त्यानंतर सन २०२४-२०२५ चे आर्थिक व्यवहार बंद करून नवीन आर्थिक वर्ष २०२५-२०२६ या वर्षाचे कामकाज सुरू करण्यात येईल याची बीड जिल्ह्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी लहू पाडुरंग गळगुंडे बीड यांनी केले आहे.

## उष्णतेच्या लाटेपासून...

रात्री खिडक्या उघड्या ठेवाव्यात व दिवसभर उष्णतेच्या झळा घरात पोहचणार नाहीत म्हणून दारे बंद ठेवावीत. याप्रमाणे विधायक सुचना लक्षात घेतल्यास उष्मा घातापासून बचाव होऊ शकतो अशा प्रकारचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना प्राचार्य राऊत डी.डी.केले. यावेळी संस्कार शिक्षण मंडळाचे संचालक ए.के.आंधळे ,उप मु.अ.मस्के ए.आर.,पर्यवेक्षक धाईतिडक पी.एम.व सर्व कर्मचारी व इयत्ता-५ वी ते ९ वी व ११वीचे विद्यार्थी उपस्थित होते.

उष्णतेच्या लाटेपासून विद्यार्थ्यांनी सावधान असावे कारण या दशकातील सर्वात जास्त उष्णता बाहेर पडत आहे दिनांक २७ मार्च ते ३१ मार्चच्य दरम्यान उष्णतेचा पारा अति उच्च पातळीवर जात आहे आसे अवाहन हवामान शास्त्रज्ञांनी केले आहे.

## असंघटित क्षेत्रातील...

युनिव्हर्सल अकाउंट नंबर (UAN) देऊन त्यांची नोंदणी करण्यासाठी ई श्रम पोर्टलवर नोंदीत झालेल्या असंघटीत, स्थलांतरित कामगारांना विविध सामाजिक सुरक्षा योजना एकाच ठिकाणी मिळण्यास मदत होणार आहे.देशातील लाखो कर्मचारी प्लॅटफॉर्म अर्थव्यवस्थेत काम करत आहेत ही बाब लक्षात घेऊन केंद्र सरकारच्या कामगार आणि रोजगार मंत्रालयाने ई श्रम पोर्टलवर प्लॅटफॉर्म कामगांराची व गिग काम गारांची नोंदणी करण्याचा निर्णय घेतलेला आहे व तशी नोंदणीची सुविधा ई श्रम पोर्टलवर उपलब्ध करण्यात आलेली आहे. प्लॅटफॉर्म कामगार आणि ई श्रम पोर्टलवर नोंदणी केल्यास त्यांचा विविध कल्याणकारी योजनेत समावेश होईल व मोठ्या प्रमाणात असलेल्या ई श्रमशक्ती सुरक्षा प्रदान करणे केंद्र शासनास शक्य होईल. प्लॅटफॉर्म कामगारांमध्ये एग्रीगेटर्स हे महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

एग्रीगेटर वरील वर्गीकरण खालील प्रमाणे करण्यात आलेले आहे

राईड शेअरिंग सेवा, अन्न आणि किराणा मालवितरण सेवा, लॉजिस्टिक सेवा, वस्तू आणि किंवा सेवांच्या घाऊक, किरकोळ विक्रीसाठी (B2B/B2C) ई मार्केट ठिकाण (बाजाराचे ठिकाण आणि इंव्हेंटरी मॉडेल दोन्ही) व्यावसायिक सेवा प्रदाता, आरोग्यसेवा, प्रवास आणि आदरातिथ्य सामग्री आणि मीडिया सेवा, इतर कोणतीही वस्तू आणि सेवा प्रदाता प्लॅटफॉर्म. वर नमूद क्षेत्रातील एग्रीगेटर यांनी ई श्रम पोर्टलवर (www.eshram.gov.in) करण्याच्या सूचना विकास आयुक्त (असंघटित कामगार) महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी दिलेल्या आहेत. बीड जिल्ह्यात वर नमूद कार्यक्षेत्रात कार्यरत असलेल्या एग्रीगेटर यांनी ई श्रम पोर्टलवर आपली नोंदणी दि. ३१ मार्च २०२५ पूर्वी करावी व आपली नोंदणी ई श्रम पोर्टलवर झाल्यानंतर आपणाकडे कार्यरत असलेल्या गिग आणि प्लॅटफॉर्म कामगारांची नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन सरकारी कामगार अधिकारी यांनी केले आहे.

## काळे झेंडे दाखवून...

सूचना शिक्षण विभागाने मुख्याध्यापकांना दिलेल्या आहेत. त्यामुळे या खोल्यांमध्ये शैक्षणिक कामकाज केले जात नाही. ज्या वर्ग खोल्यांना मोठ्या दुरुस्तीची गरज आहे अशा शाळाच्या वर्ग खोल्यांना छप्पर, भिंती, फरशी, दरवाजे, खिडक्यांची दुरुस्ती व रंगकामाची आवश्यकता आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांच्या वर्ग खोल्या दुरुस्ती करता व नवीन वर्ग खोल्या बांधकामासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची मागणी ग्रामस्थ अनेक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे करत आहेत. सामाजिक कार्यकर्ते डॉ . गणेश ढवळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी आंदोलने केलेली आहेत. परंतु शासन ज्ञानमंदिरे बांधण्यासाठी निधी देताना हात आखडता घेत असल्याचे चित्र आहे .

सन २०२३-२५ मध्ये जिल्हा वार्षिक योजना (डीपीडीसी ),पंधरावा वित्त आयोग, जिल्हा परिषद फंड, गौण खनिज योजना या योजनेअंतर्गत उपलब्ध निधीच्या मर्यादेत १३० शाळांमधील ३१५ वर्गखोल्या दुरुस्तीसाठी ८ कोटी २९ लाख रुपये दिलेले आहेत. धोकादायक असलेल्या वर्ग खोल्यांपैकी ७३ वर्ग खोल्यांच्या बांधकाम ाकरिता व पत्र्याच्या शेडमध्ये भरणाऱ्या २५ शाळांकरीता करता २५ वर्ग खोल्या बांधकामासाठी असे एकूण ९८ वर्गखोली बांधकामा करिता रुपये १२ कोटी ७५ लाख निधी मंजूर करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत अनेक शाळांचे काम अद्याप सुरू झालेले नाही. कार्यारंभ आदेश होऊनही शाळांची कामे केली जात नाहीत. काही ठिकाणी दुरुस्ती ऐवजी नव्याच शाळा बांधाव्यात अशी मागणी ग्रामस्थ करत आहेत.

बीड जिल्ह्यातील तालुका निहाय धोकादायक वर्गखोल्यांची संख्या

बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या धोकादायक वर्ग खोल्यांची संख्या तालुका निहाय खालील प्रमाणे आहे.आष्टी ११९, आंबेजोगाई ३०, बीड ३७, धारूर ३०, केज २२, गेवराई १२५, माजलगाव २६, परळी ८८, पाटोदा ४०, शिरूर ३२ वडवणी ४३ एकूण ५९२

५५ कोटींचा नव्याने प्रस्ताव

५४१ वर्गखोल्यांच्या मोठ्या दुरुस्तीकरता १३ कोटी १४ लाख ६३ हजार रुपयांचा निधी व ५१९ धोकादायक वर्ग खोली बांधकाम व पत्र्याच्या शेडमध्ये भरणाऱ्या ३८ शाळांमध्ये ३८ वर्गखोली बांधकाम ासाठी असे एकूण ५५ कोटी ७० लाख रुपये निधी मिळण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहेत.

५९२ धोकादायक वर्गखोल्यांसाठी निधी मिळावा म्हणून शासनाकडे प्रस्ताव पाठवला आहे : भगवान फुलारी , शिक्षणाधिकारी प्रा.जि.प.बीड

जिल्ह्यातील ५९२ वर्गखोल्या धोकादायक असून त्या ठिकाणी अध्यापन करू नये असे मुख्याध्यापकांना कळविलेले असून तेथील विद्यार्थ्यांची पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली आहे. शाळांना निधी मि ळावा यासाठी आम्ही शासनाकडे प्रस्ताव पाठवलेला आहे. शासनाकडून अपेक्षित निधी मिळेल असे वाटते अशी प्रतिक्रिया शिक्षणाधिकारी प्रा.जि.प.बीड भगवान फुलारे यांनी दिली.

पालकमंत्री अजितदादांना काळे झेंडे दाखवणार : डॉ.गणेश ढवळे

मागील अनेक वर्षांपासून जिल्ह्यातील ज्ञानमंदिरांना निधी मिळावा यासाठी शिक्षण विभागापासुन जिल्हाधिकारी ते आमदार, खासदार, शिक्षणमंत्री यांना प्रत्यक्ष भेटून निवेदने दिली आहेत आणि आंदोलने केलेली आहेत.परंतु शासनाला याविषयाचे गांभीर्य नसुन दि.२ एप्रिल रोजी उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड यांना आम्ही काळे झेंडे दाखवून नाराजी व्यक्त करणार असल्याचे सामाजिक कार्यकर्ते तथ मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे यांनी सांगितले.

## स्वत:च्या हक्काच्या...

सचीन जगताप सोनु अकंल राजकुमार जैन नजीर भाई अक्षय भालेराव आरेफ शेख, विशाल जोशी जीलानी भाई अकाश जवकर रोहीत कुलकर्णी यश गुरखुदे गोविंद सरदे तसेच व इतर द्वारकाधीश मित्र मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते. शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरासाठी अर्ज करण्याची मोठी संधी मिळाली असून, भविष्यात अशा उपक्रमांचे आयोजन करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# माजलगावमध्ये जिजाऊ रथयात्रेचे भव्य स्वागत होणार
# ऐतिहासिक उपक्रमाला साथ देण्याचे आवाहन

**माजलगाव । प्रतिनिधी**

मराठा सेवा संघ संचलित जिजाऊ रथयात्रा – २०२५ अंतर्गत मराठा जोडो अभियान आणि शिव संकल्प अभियान माजलगाव येथे दि. २९ मार्च २०२५ रोजी भव्य स्वरूपात साजरे होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि जिजाऊ माँसाहेब यांच्या प्रेरणेतून सामाजिक एकता आणि परिवर्तनासाठी हा अनोखा उपक्रम राज्यभरात प्रभावीपणे पोहोचत आहे. माजलगावमध्ये रथयात्रेचे आगमन शनिवार दिनांक: २९ मार्च २०२५ रोजी होणार आहे. यावेळी संध्याकाळी ६:०० वा. डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते छत्रपती संभाजी महाराज चौक या मार्गाने शोभायात्रा काढून विठ्ठल रुक्मिणी मंदिर, छत्रपती नगर बायपास रोड, माजलगाव येथे समारोप प्रसंगी सभा व महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध शाहीर राजेंद्र खुडुसकर यांचा बहारदार पोवाडा यांचा कार्यक्रम होणार आहे.

कार्यक्रमाची ठळक वैशिष्ट्ये: रथयात्रेचे भव्य स्वागत: माजलगावात रथयात्रेच्या आगमनाचा दिमाखदार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. विशेष व्याख्याने: शिवचरित्र आणि जिजाऊंच्या विचारांवर आधारित प्रेरणादायी व्याख्याने. सामाजिक चर्चा: शिक्षण, रोजगार, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि महिलांचे सक्षमीकरण यासारख्या महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन आणि चर्चा. सांस्कृतिक कार्यक्रम: शाहीरांचे पोवाडे आणि प्रेरणादायी गीतांचा समावेश. युवकांसाठी कार्यशाळा: नेतृत्व आणि संघटन कौशल्य विकसनासाठी विशेष कार्यशाळा. सामाजिक एकतेसाठी संदेश: एकीने परिवर्तन घडवूया, जिजाऊ-शिवरायांच्या स्वप्नांना साकार करूया! या संदेशासह आयोजकांनी सर्व समाज बांधव, सामाजिक संघटना, युवक-युवती आणि महिलांना या ऐतिहासिक सोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. हा उपक्रम समाजाला एकत्र आणून संघटनेची ताकद वाढवण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. तरी शिवप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाला यशस्वी करण्याची विनंती आयोजकांनी केली आहे. माजलगावातील हा सोहळा सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने एक पाऊल ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. शोभायात्रेमध्ये अकलूज येथील प्रसिद्ध हलगी पथक , महापुरुषांची वेशभूषा केलेले विद्यार्थी, भगवा ड्रेस परिधान केलेले विद्यार्थी , फेटाधारी महिला, पुरुष यांची उपस्थिती राहणार आहे.

# मुलाच्या जन्मदिनी माणुसकीचे मूल्य संवर्धित उपक्रम : आयुष अडागळेचा वाढदिवस उत्साहात

**माजलगाव । प्रतिनिधी**



वाढदिवस म्हंटल की, अमाप खर्च होतो.मात्र या खर्चाला फाटा देऊन पत्रकार बाळासाहेब अडागळे यांनी त्यांचा मुलगा आयुष याचा वाढदीवस अगदी कौतूकास्पद साजरा केला.

हा जन्मदिन मुख बधिर विद्यालयातील मुलांना खिचडी व खाऊचे वाटप करुन साजरा केला.त्यामुळे माणुसकीचे मूल्य संवर्धित झाले असून पत्रकार बाळासाहेब अडागळे यांचे कौतूक होत आहे.

माजलगाव शहरातील जनार्थ शिक्षण प्रसारक मंडळ संचिलीत मुख बधिर विदयालय आयोजित वाढदिवस कार्यक्रमास माजी सभापती नितीन नाईकनवरे, डॉ. यशवंत राजेभोसले, तलाठी संघटनेचे अध्यक्ष रूपचंद्र आभारे ,संपादक प्रचंड सोळंके, संपादक परमेश्वर सोळंके, अमर साळवे, शेख सलीम, अभिनेत्री प्राची सोनवणे, पत्रकार दत्ता येवले, गायक सौरभ सिरसाट, लेखक केतन हातागळे, हरिभाऊ गवते, सुनिल डोंगरे, रविकांत राठोड, अनिल खंडागळे, नारायण राठोड, प्रचंड सोळंके, मुख्याध्यापक मुख्याध्यापक थळपती, ए.एम. पाटील प्रकाश, आगे प्रकाश उत्तम आगे, पाटील उत्तम, जगन्नाथ आगे, विठ्ठल जाधव, सुनील पवार, विठ्ठल खंडगावे, उद्धव कोरडे,आदी उपस्थित होते.

यावेळी आलेल्या प्रमुख पाहुण्यांनी प्रत्येकानी आपल्या वाढदिवसाचा व्यर्थ खर्च गोरगरीब मुलांसाठी खर्च करावा, महाराष्ट्राची आदर्श संस्कृती दाखून द्यावी असे मत सर्व प्रमुख पाहुण्यानी व्यक्त केले. यावेळी आश्रमातील विद्यार्थ्यांना खिचडी व गोड जेवण देण्यात आले. यावेळी बहूसंख्ये विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संकेत गायकवाड, रंजीत आडागळे, संतोष घट्टे यांच्यासह आदीं परिश्रम घेतला.

# मच्छिंद्रनाथ देवस्थानच्या संजीवन समाधी महोत्सवाचे 29 आणि 30 मार्च रोजी आयोजन

**आष्टी । प्रतिनिधी**



बीड, नगरसह महाराष्ट्रातील अनेक भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या आष्टी तालुक्यातील सावरगाव नजीकच्या मच्छिंद्रनाथ देवस्थान (मायंबा) समाधी महोत्सवाचे २९ आणि ३० मार्च रोजी आयोजन करण्यात आले आहे.

आष्टी तालुक्यातील सावरगाव येथे संपूर्ण जगामध्ये एकमेव अशी मच्छिंद्रनाथांची एकमेव संजीवन समाधी असून गेल्यावर्षी दर्शन रांगेमध्ये प्रचंड अडचणी आल्या होत्या.काही त्रुटी राहिल्या होत्या .त्या त्रुटी यावर्षी आम्ही सर्व सुधारल्या आहेत. आजपर्यंत सायंकाळी सात वाजता समाधी उघडी करून दर्शन सुरू होत होते मात्र यावर्षी सकाळी दहा वाजता कावडी येतील .दुपारी साडेबारा वाजता आरती होईल .एक वाजेपर्यंत उटणे काढणे कार्यक्रम .दुपारी एक ते चार कावडीने आणलेले पाणी घालणे.व चार वाजता उटणे (लेप)लावणे कार्यक्रम सुरू होणार असून दुसऱ्या दिवशी पहाटे पाच वाजेपर्यंत समाधी दर्शन सुरू राहील हा बदल वाढत्या गर्दीमुळे करण्यात आला आहे. असे आ.सुरेश धस (आष्टी विधानसभा) यांनी माहिती दिली. गर्भगिरीच्या पर्वत रांगेतील आष्टी आणि पाथर्डी तालुक्याच्या हद्दीवर मच्छिंद्रनाथ मायंबा हे देवस्थान आहे. या ठिकाणी राज्यभरातून भाविक दर्शनासाठी येत असतात. दरवर्षी गुढीपाडव्याला येथे मोठी यात्रा भरते . त्याच्या आधी संजीवन समाधी महोत्सवामध्ये विविध उपक्रमास सुरुवात होते. यावर्षी मंगळवार दिनांक २५ मार्चपासून हा महोत्सव सुरू होत असून या दिवशी निशाण दिंडीचे मच्छिंद्रनाथ गडाहून पैठण कडे प्रस्थान होईल . २९ मार्च रोजी पैठण येथे निशान मिरवणूक होईल. तेथून कावडीसह गडाकडे भाविक प्रस्थान करतील . २९ मार्च रोजी निशान आणि कावडीचे मच्छिंद्रगड येथे आगमन होईल.आधी महाआरती होईल त्यानंतर दुपारी दीड ते सायंकाळी चार या वेळेत विविध ठिकाणाहून कावडीने आणलेल्या गंगाजलाने समाधीस अभिषेक केला जाईल. सायंकाळी चार ते पहाटे साडेपाच या वेळेत समाधीस उटणे, चंदन लेप लावणे हा कार्यक्रम पार पडेल.

# आज बीड येथे विश्वस्थांची कार्यशाळा: धर्मदाय उपायुक्त प्रदिप चौधरी

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने बीड जिल्ह्यातील विश्वस्तांसाठी १०० दिवसाच्या कृती आराखड्या अंतर्गत व मा.मुख्यमंत्री यांच्या संकल्पनेतून विश्वस्तांसाठी कायद्याचे ज्ञान तसेच न्यास व संस्थेचे कार्य व व्यवस्थापक कायद्यानुसार होण्यासाठी तसेच न्यासाचे कार्य व विश्वस्ताचे उत्तर दायकत्वाची माहिती व सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेमधील कायद्याची माहिती देण्यासाठी विश्वस्त कार्यशाळा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बीड व बीड जिल्हा धर्मादाय वकिल संघ बीड यांच्या संयुक्त विद्यमाने सोनाजीराव क्षीरसागर होमि ओपॅथिक मेडिकल कॉलेज बीड नवगण कॉलेज रोड बीड येथे दि.२८ मार्च रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २ वाजेपर्यंत आयोजित केले आहे. या विश्वस्त कार्यशाळेच्या कार्यक्रमाचे अधयक्ष म्हणून धर्मादाय उपायुक्त बीड प्रदिप चौधरी यांची उपस्थिती लाभणार आहे.

या प्रसंगी विशेष उपस्थिती म्हणून माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर,तसेच कार्यक्रमाचे मुख्य निमंत्रक सहाय्यक धर्मादाय आयुक्त सुधीर कांबळे, बीड जिल्हा धर्मादाय वकील संघाचे अध्यक्ष ॲड. उदयसिंह सालपे, या विश्वस्त कार्यशाळेचे निमंत्रक म्हणून उपस्थित राहतील. या सर्वांच्या उपस्थितीत विश्वस्तांना विश्वस्त कार्यशाळेव्दारे संस्थेच्या व न्यासाच्या पदाधिकार्यासह विश्वस्तांना अमुल्य मार्गदर्शन देण्यासाठी या विश्वस्त कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून धर्मादाय सह आयुक्त लातूर राजेश ससाणे यांच्या उपस्थितीत जिल्ह्याच्या विश्वस्तांना मार्गदर्शन लाभणार आहे. या कार्यशाळेचा जिल्ह्यातील सर्व विश्वस्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बीड व बीड जिल्हा धर्मादाय वकिल संघ बीड यांच्या वतीने करण्यात आले आहे. या बैठकीस धर्मादाय उपयआयुक्त बीड प्रदिप चौधरी, सहाय्यक धर्मादाय आयुक्त बीड सुधीर कांबळे व कार्यालयीन कर्मचारी वृंद तसेच बीड जिल्हा धर्मादाय वकिाल संघ बीडचे अध्यक्ष ॲड.उदयसिंह सालपे, माजी अध्यक्ष ॲड.राम औटे,ॲड. हुंबे मॅडम, आदी उपस्थित होते.

# श्री क्षेत्र रामगड येथील नारळी सप्ताहाला ३० मार्च रोजी प्रारंभ

**बीड । प्रतिनिधी**



श्री क्षेत्र रामगड संस्थानचा ४६ वा नारळी अखंड हरिनाम सप्ताह यावर्षीही रामगड येथेच होणार आहे. रविवार, ३० मार्च रोजी या सप्ताहास प्रारंभ होणार असून सप्ताहाची जय्यत तयारी करण्यात आली आहे. भावार्थ रामायणासह ख्यातनाम महाराज मंडळीची कीर्तनसेवा या सप्ताहात होणार असून याचा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री क्षेत्र रामगड संस्थानचे मठाधिपती स्वामी योगीराज महाराज यांनी केले आहे.महंत ब्रम्हलिन महात्मा राब बाबा यांच्या कृपाशिर्वादाने वै.किसन बाबा, वै.लक्ष्मण बाबा यांच्या प्रेरणेने व मठाधिपती महंत स्वामी योगीराज महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीराम जन्मोत्सवानिमित्त वार्षिक नारळी अखंड हरिनाम सप्ताह रामगड येथे होणार आहे. या सप्ताहाची जय्यत तयारी करण्यात आली असून रविवार, ३० मार्च रोजी या सप्ताहास प्रारंभ होत असून ६ एप्रिल रोजी सांगता होणार आहे. या सप्ताहात दररोज पहाटे काकडा भजन, विष्णूसहश्रनाम, गाथाभजन, प्रवचन, संगीत भजन यासह दैनंदिन कार्यक्रम होणार आहेत.

# गौरी तांबेचा सत्कार

**दिंद्रुड । प्रतिनिधी**



जवाहर नवोदय विद्यालयाचा इयत्ता सहावी प्रवेश पूर्व परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, दिंद्रुड ची विद्यार्थिनी गौरी तांबे प्रवेश पात्र ठरल्या बाबत तिच्या सत्काराच्या आयोजन शाळेच्या वतीने गुरुवारी करण्यात आले होते.

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक वशिष्ठ मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली मुख्याध्यापक मंचक सोळंके,पत्रकार प्रकाश काशीद,ग्रा.पं.सदस्य अतुल चव्हाण, दिंद्रुड पत्रकार संघाचे अध्यक्ष अमोल ठोंबरे, संतोष स्वामी,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा द्रौपदी कटारे, सुनिता वकरे यांची प्रमुख उपस्थिती याप्रसंगी होती.

इंग्रजी शाळांच्या स्पर्धेत ज्ञानदानाच्या कार्यात जिल्हा परिषद शाळा आता सरसावत सक्रिय झाल्या आहेत. विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन करण्यासाठी तत्पर असलेल्या शिक्षक वर्गांच्या कर्तव्य निष्ठेमुळे दिंद्रुड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची पहिली विद्यार्थिनी गौरी ज्ञानेश्वर तांबे ही जवाहर नवोदय विद्यालय गढी येथे प्रवेशास पात्र ठरली. यापुढे स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांची विशेष तयारी करून घेणार असल्याचे याप्रसंगी मुख्याध्यापक मुंडे यांनी सांगितले. गौरी तांबे हिने मनोगत व्यक्त करताना मला माझ्या शिक्षक वृंदांसह आई-वडिलांनी परीक्षेसंदर्भात योग्य मार्गदर्शन केल्याने हे मी यश मिळवल्याचे सांगितले. आपल्यासाठी हाडाची काड व रक्ताचे पाणी करणाऱ्या आई-वडिलांना जपा हा मौलिक सल्ला चिमुकल्या विद्यार्थीनी गौरीने दिल्यानंतर उपस्थितांना गहिवरून आले. नवनाथ दुधाळ यांनी सूत्रसंचलन तर रामकिसन चाटे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## माझी शाळा, सुंदर शाळा; नागनाथ विद्यालय प्रथम पिंपळवाडी विद्यालय द्वितीय

**बीड । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा २०२४-२५ या अभियानांतर्गत बीड तालुक्यात गुणानुक्रमाणे प्रथम मोरगाव येथील नागनाथ विद्यालय तर पिंपळवाडी विद्यालयाने द्वितीय क्रमांक मिळवला आहे. त्याबद्दल आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, शाळेच्या कर्मचार्यांनी अभिनंदन केले.

# मनसे व म्हाळसा यांच्या डान्स स्पर्धेला अभूतपूर्व प्रतिसाद

**• महिला मुलींनी नोंदवला अभूतपूर्व सहभाग**

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे संकल्पनेतून व म्हाळसा प्रतिष्ठानच्या सहकार्याने आयोजित डान्स स्पर्धा २०२५ ला मोठा प्रतिसाद मिळाला. स्पर्धेची सुरुवात छ.शिवाजी महाराज, मासाहेब जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. प्रा. दुष्यंता रामटेके, बीड प्रसारचे संपादक समीर काझी, दैनिक पार्श्वभूमीचे आनंद वीर, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे, म्हाळसा प्रतिष्ठानच्या सचिव मयुरीताई बाबर यांचे समवेत दुसरे मान्यवर करीत झाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानदेव काशीद यांनी केले. डान्स स्पर्धेत महिलांच्या व मुलींच्या सहभागाची नोंद घेण्यात आली, ज्यामुळे या कार्यक्रमाला विशेष रंगत आली. अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात जागतिक महिला दिन निमित्ताने साजरा करण्यात आला. यावेळी, डान्स स्पर्धेत सहभागी महिला व मुलींनी आयोजक वर्षाताई जगदाळे यांचे आभार मानून महिलांना एक स्वतंत्र व्यासपीठ दिल्याबद्दल प्रशंसा केली. या पहिल्याच डान्स स्पर्धेने एकत्रित प्रतिभा आणि सामर्थ्य व्यक्त करण्यासाठी एक चांगला मंच प्रदान केला आहे, ज्यामुळे महिला सशक्तीकरणाच्या पथावर एक महत्त्वपूर्ण पाऊल पडले आहे. या विशेष कार्यक्रमामध्ये सहभागी झालेल्या सर्वांसाठी एक अद्भुत अनुभव ठरला, आणि भविष्यातील स्पर्धांसाठी एक सकारात्मक संदेश गेला.



# आदित्य कृषी व कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या १५ विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्ह्यू मधून निवड



**बीड । प्रतिनिधी**

आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य कृषी व कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयात २५ मार्च रोजी आयोजित कॅम्पस इंटरव्ह्यू मध्ये ६० विद्यार्थी सहभागी झाले होते. झायडेक्स इंडस्ट्रीज या नामांकित कंपनी त्यातील १५ विद्यार्थ्यांची निवड केली असून त्यांना १ मे पासून १ महिन्याचे प्रशिक्षण बडोदा येथे दिले जाणार आहे. त्यानंतर हे विद्यार्थी महाराष्ट्रासह गुजरातमध्ये सेवा देणार असून कंपनीने त्यांचा चांगले पॅकेज दिले आहे. विद्यार्थ्यांची आकलन क्षमता वृद्धिंगत करणे, त्यांच्या नाविन्यपूर्ण

कल्पनाशक्तीला पुरेशी नोकरीची संधी उपलब्ध करून देणे आणि पदवी शिक्षणाबरोबरच सामाजिक, शैक्षणिक व उद्योजकीय विकास रुजवणे अशा उदात्त हेतुने आदित्य शिक्षण संस्था कायम कार्यरत असते याचाच एक भाग म्हणून आदित्य शिक्षण संस्थेत झायडेक्स इंडस्ट्रीज या नामांकित कंपनी मार्फत घेण्यात आलेल्या कॅम्पस इंटरव्ह्यू मधून आदित्य कृषी महाविद्यालय व आदित्य कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या अंतिम वर्षात शिकत असलेल्या १५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. आदित्य कृषी महाविद्यालय व आदित्य कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या ६० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता त्यापैकी १५ विद्यार्थ्यांची निवड झाली. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा, आदित्य कृषी अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कल्याण अपेट, आदित्य कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य शाम भुतडा, आदित्य कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कचरे, आदित्य कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल सानप, डॉ. प्रसाद खेडकर, डॉ.संदिप मोरे, डॉ. धनंजय सातपुते व प्लेसमेन्ट अधिकारी प्रा. प्रिया गव्हाने, प्रा. एस. आर. चव्हाण यांनी विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

दैनिक
● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
शुक्रवार, दि.२८ मार्च २०२५ पान ४

## बोबाटी नदी संवाद परिक्रमा आज विडा ग्रामपंचायतपासून

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचा उमक्रम असलेल्या चला जाणूया नदीला या उपक्रमांतर्गत उद्या शुक्रवार दि. २८ मार्च २०२५ रोजी बोबाटी नदी संवाद परिक्रमा चे उद्घाटन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या हस्ते होत आहे.राज्यातील नद्या अमृतवाहिनी करण्याचा संकल्प या उपक्रमात करण्यात आला आहे. यात उद्या केज तालुक्यातील विडा ग्रामपंचायत येथे सकाळी ९.३० वाजता हे उद्घाटन होईल. यावेळी या अभियानाचे राज्यस्तर सदस्य अनिकेत लोहिया, अभियानाचे सचिव विभागीय वनाधिकारी ए.बी. गर्कळ यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. ही नदी पुनरुज्जीवन, जनजागृती व नदीच्या समस्या अभ्यासण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या यात्रेत नदी क्षेत्रातील तज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते व शासन अधिकारी* मार्गदर्शन करणार आहेत. या संवाद यात्रेसाठी इंडिया वॉटर पार्टनरशिप व सर्वज्ञ करिअर अकॅडमी केज इतर भागीदारी संस्थेचे सहकार्य लाभत आहे.

# निराधारांची ससेहोलपट; 'KYC'साठी आलेल्या वृद्धेचा तहसीलमध्ये भोवळ आल्यानंतर मृत्यू

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

संजय गांधी निराधार योजनेचे शासकीय अनूदान बंद होऊ नये म्हणून केवायसीसाठी आलेल्या निराधारांची ससेहोलपट काही केल्या थांबण्याची चिन्ह नाहीत. यातच तीव्र उन्हात धारूर तहसील कार्यालयामध्ये केवायसीसाठी आलेल्या ७० वर्षीय कमलबाई बाबूराव कसबे यांचा भोवळ आल्यानंतर मृत्यू झाल्याची खळबळजनक घटना आज दुपारी १२ वाजेदरम्यान घडली. प्रशासकीय यंत्रणेच्या निष्काळजीपणाचा हा बळी असल्याच्या संतप्त भावना निराधारांनी व्यक्त केल्या.

तालुक्यातील जहागीर मोहा येथील कमलबाई बाबुराव कसबे या धारूर तहसील कार्यालयात संजय गांधी निराधार योजनेसाठी केवायसी करण्यासाठी दुपारी १२ वाजेच्या दरम्यान भर उन्हात आल्या होत्या. कार्यालयात मोठ्या प्रमाणावर वृद्ध केवायसी करण्यासाठी आल्याने रांगा लागल्या होत्या. या रांगेत कमलबाई देखील थांबल्या. परंतु, अचानक त्यांना भोवळ आल्याने त्या कोसळल्या. उष्माघात झाल्याचे लक्षात येताच ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यासाठी नेत असताना त्यांचा मृत्यू झाला.



### ● वृद्धांची ससेहोलपट कधी थांबणार ?

तहसील कार्यालयात विविध योजनांच्या केवायसीसाठी वृद्ध भर उन्हात मोठ्याप्रमाणावर येत आहेत. त्यांना येथे कोणत्याही सोयीसुविधा नाहीत. सर्वांना खूप त्रास सहन करावा लागत आहे. कमलबाई कसबे या गलथान व्यवस्थेचा बळी ठरल्या आहेत. प्रशासनाने दक्षता घेऊन काम करावे, अशी मागणी पंचायत समितीचे माजी उपसभापती प्रकाश दादा कोकाटे यांनी केली आहे. याबाबतीत तहसीलदार श्रीकांत निळे यांना तक्रार करून वृद्ध नागरिकांचा त्रास तात्काळ थांबवावा, अशी मागणी केल्याचे त्यांनी सांगितले.

## पैठणच्या उजव्या कालव्यात वाहुन गेलेला अमर लोखंडे यांचा मृत्यूदेह चोवीस तासानंतर सापडला

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील गणेश नगर भागात राहणारे शेतकरी शिवाजी लोखंडे यांचे चिरंजीव अमर लोखंडे वर्षे ११ दिनांक २५ रोजी बारा वाजता सुमारास घरातून मुला सोबत उजव्या कालव्यात पोहण्यासाठी गेला होता अमर लोखंडे यांच्या करदुड्याला दोरी बांधून काही मुलांनी पाहण्यासाठी अमरला पाण्याम ध्ये सोडले परंतु ती दोरी तुटून



उजव्या कालव्यात अमर वाहून गेला तब्बल दोन दिवसापासून अमरचा शोध सुरू होता पण तो सापडत नव्हता परंतु दिनांक २७ मार्च रोजी जातेगाव येथे त्यांचा मृतदेह पाण्यावर तरंगताना आढळून आला तब्बल २४ तासानंतर अमर लोखंडे यांचा मृतदेह सापडला असून लोखंडे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे म्हणून तलवाडा व तलवाडा परिसरामध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

## लग्न ठरले, सुपारीच्या कार्यक्रमाच्या काही तासांपूर्वीच युवकाचा विजेच्या धक्क्याने मृत्यू



**बीड । प्रतिनिधी**

सकाळी आठच्या दरम्यान कपड्याला इस्त्री करत असताना अचानक विजेचा धक्का बसून युवकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना गुरूवारी सकाळी आष्टी तालुक्यातील म्हसोबावाडी येथे घडली. ओंकार मच्छिंद्र शेकडे असे मृत युवकाचे नाव आहे. आष्टी तालुक्यातील म्हसोबावाडी येथील ओंकार शेकडे या तरुणाचे लग्न ठरले होते. आज दुपारी सुपारीचा कार्यक्रम होता. याच कार्यक्रमात विवाहाची तारीख काढायची होती. दरम्यान, आज सकाळी आठ वाजेच्या दरम्यान ओंकार कपड्यांना इस्त्री करत होता. अचानक इस्त्रीमध्ये विद्युत प्रवाह उतरल्याने धक्काबसून ओंकारचा जागीच मृत्यू झाला. एकुलता एक मुलगा गेल्याने शोक अनावर तीन मुलीच्या पाठीवर ओंकार झाला होता. घरातील एकुलता एक मुलगा मृत झाल्याने शेकडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्याच्या पश्चात आई-वडिल, तीन बहिणी असा परिवार आहे.

## शासकीय आर्थिक व्यवहारांकरिता ३० आणि ३१ मार्च रोजी भारतीय स्टेट बँक रात्री १२.00 वाजेपर्यंत सुरु ठेवण्यात येणार

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील सन २०२४-२०२५ आर्थिक वर्षाचे शासकीय व्यवहार पूर्ण करण्यासाठी दिनांक ३० मार्च २०२५ रोजी व दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी बीड कोषागार तसेच अधिनस्त सर्व उपकोषागार कार्यालय तसेच भारतीय स्टेट बँक व इतर सर्व शासकीय व्यवहार करणाऱ्या बँकेच्या शाखा

▶▶ उर्वरित पान २ वर

## उष्णतेच्या लाटेपासून विद्यार्थ्यांनी सावधान रहावे : प्राचार्य डी.डी.राऊत

**वडवणी । प्रतिनिधी**

महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वडवणी येथे दि.२६ मार्च बुधवार रोजी सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राचार्य राऊत डी.डी. म्हणाले की, महाराष्ट्र शासनाने २१ मार्च २०२५ रोजी एक शासन आदेश काढून उष्णतेच्या लाटेपासून विद्यार्थ्यांना कसे परावृत्त करता येईल अशा



विधायक कल्पना व सूचना म ांडल्या आहेत.

यावेळी बोलताना प्राचार्य राऊत डी. डी. म्हणाले की, विद्यार्थी मीत्रहो ...! शासनाने विद्यार्थ्यांना उष्णतेच्या लाटेपासून दूर राहण्यासाठी सुचित्त केले आहे. कोणत्याही अस्थापनेने दुपारच्या सत्रात परीक्षा ठेऊ नयेत. विद्यार्थ्यांनी शाळेला येताना थंड पाण्याची बॉटल सोबत ठेवावी. डोक्यावर कॅप्र अथावा डोके झाकले जाईल आसे अच्छादन असावे. दुपारी १२.००ते ३.०० च्या दरम्यान कोणीही घराबाहेर पडू नये. शालेय तासीका - खेळ -क्रिडांगणावर घेऊ नयेत.

तसेच उष्णतेपासून बचाव करण्यासाठी, लिंबू-शरबत ,खरबुज, टरबुज,द्राक्षे,संत्री यासारखी पेय घ्यावीत, सतत पाणी प्यावे,ओ.आर.एस.च्या पुड्यांचा पाण्यात टाकून पिव्यासाठी वापर करावा. ▶▶ उर्वरित पान २ वर

## असंघटित क्षेत्रातील कामगारांनी ई श्रम पोर्टलवर ३१ मार्चपर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

भारत सरकार कामगार आणि रोजगार मंत्रालय संघटित आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या हिताचे रक्षण आणि संरक्षण करून कल्याणाचा प्रचार आणि सामाजिक सुरक्षा प्रदान करुन देशातील कामगार शक्तीचे जीवन आणि प्रतिष्ठा सुधारण्यासाठी सतत कार्यरत आहे. प्लॅटफॉर्म इकॉनॉमी हे भारतातील आणि जागतिक स्तरावरील एक उदयनमुख क्षेत्र आहे आणि अलीकडील काळात रोजगार निर्मितीचा एक महत्त्वाचा स्रोत बनला आहे. देशातील भारत सरकार कामगार आणि रोजगार मंत्रालयाने २६ ऑगस्ट २०२१ रोजी देशातील असंघटित, स्थलांतरित कामगारांना

▶▶ उर्वरित पान २ वर




### 2 एप्रिल रोजी बीड मध्ये नियोजन बैठकीसाठी येणा-या उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री तथा नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांना...

# काळे झेंडे दाखवून नाराजी व्यक्त करणार: डॉ.गणेश ढवळे





**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या २४७६ शाळा आहेत. या शाळांमध्ये १०,४७९ वर्गखोल्या असून यातील ५९२ वर्गखोल्या आता धोकादायक असून या ठिकाणी अध्यापन करू नये असे शिक्षण विभागाने कळविलेले आहे. दरम्यान धोकादायक इमारतीतील विद्यार्थी मंदिर, ग्रामपंचायत आणि झाडांचा आसरा घेऊन ऊन पावसात बसत आहेत. या धोकादायक शाळांना कोणी इमारत देत का इमारत असे म्हणण्याची वेळ आलेली आहे. शिक्षण विभाग, आमदार, खासदार, शिक्षणमंत्री यांना गेल्या ३-४ वर्षांपासून निवेदने आणि आंदोलने करूनही शासन याकडे गांभीर्याने पहात नसल्याने दि.२ एप्रिल रोजी बीड मध्ये नियोजन बैठकीसाठी येणारे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांना काळे झेंडे दाखवून तिव्र नाराजी व्यक्त करणार असल्याचे सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी म्हटले आहे.

यु-डायस २०२३-२४ च्या माहितीनुसार बीड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या २४७६ शाळा आहेत. सदर शाळांमध्ये चांगल्या वर्ग खोल्यांची संख्या १०,४७९ आहे. पैकी ७७९ वर्ग खोल्यांची किरकोळ दुरुस्ती व ८५६ वर्ग खोल्यांना मोठ्या दुरुस्तीची गरज आहे. जिल्हा परिषदेच्या ३४९ शाळांमध्ये ५९२ वर्गखोल्या धोकादायक आहेत. परंतु धोकादायक असलेल्या वर्ग खोल्यांमध्ये विद्यार्थ्यांचे अध्यापन करण्यात येऊ नये, अशा

▶▶ उर्वरित पान २ वर

# स्वत:च्या हक्काच्या घरासाठी बीडकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद!

**बीड । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत द्वारकाधीश मित्र मंडळाच्या वतीने मोफत ऑनलाइन फॉर्म भरणा शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फ ूर्त प्रतिसाद मिळाला असून, शहरातील व वार्डतील अनेक इच्छुक लाभार्थ्यांनी आपल्या हक्काच्या घरासाठी मोफत अर्ज भरले.

या शिबिरात लाभार्थ्यांना अर्ज भरून देण्यात आले, तसेच अर्जाच्या यशस्वी नोंदणीसाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. शिबिराच्या समारोपप्रसंगी अर्ज भरलेल्या नागरिकांना अधिकृत पावती देण्यात आली. यावेळी नगरसेवक श्री. जगदीश गुरखुदे, परशुराम गुरखुदे, तसेच या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष मेहनत घेतलेल्या राजू शेख यांचा उपस्थित लाभार्थ्यांनी मनःपूर्वक आभार मानले. तसेच बीड नगरपरिषदेचे कर्मचारी तांबारे साहेब व शुभम सावंत यांनी देखील या उपक्रमात सहकार्य केले. कार्यक्रमाला शेख आयाज,

▶▶ उर्वरित पान २ वर

